राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायतींच्या आस्थापना बाबींविषयक मागविणेत येणाऱ्या मार्गदर्शनाच्या कार्यपध्दतीबाबत.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
नवीमुंबई महानगरपालिका इमारत,
७ वा मजला बेलापूर भवन (सी.बी.डी.)

परिपत्रक क्रमांक:-नपप्रस/२०२१/सर्व न.प/आस्थापना सेवा विषयक बाबी/प्र.क्र. ४५/कक्ष-४/ 6120

बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

दिनांक :- 08 NOV 2023

**वाचा:-** संचालनालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक २३.०५.२०२२.

**परिपत्रक**

**प्रस्तावना-**

१. राज्यातील नगरपरिषदा /नगरपंचायतींच्या कर्मचारी आस्थापनाविषयक बाबींबाबत दिनांक २३.०५.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये कार्यपध्दती निश्चित करणेत आली आहे. त्यानुसार प्रशासकीय शिस्त राखण्याच्या दृष्टीने संबंधित प्राधिकारी यांनी शासन व संचालनालयाचे अद्ययावत आदेशांची दखल घेऊन प्रकरणे त्वरीत निकाली काढणेबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत,असे असताना देखील जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदा /नगरपंचायतींकडून तसेच विविध संघटनाकडून विहित मार्गाचा अवलंब न करता व अपुर्ण पृष्ठीसह / कोणताही स्वयंस्पष्ट अभिप्राय न देता पूर्वीच्या आणि अद्यावत शासन निर्णयांचा / परिपत्रकांचा / आदेशांचा संदर्भ न घेता मार्गदर्शनाच्या नावाखाली अनावश्यक पत्रव्यवहाराद्वारे थेट संदर्भ संचालनालयास सादर करणेत येतात.

२. ज्या प्रकरणांवर जिल्हा सह आयुक्त व मुख्याधिकारी यांचेस्तरावरून कार्यवाही करून संबंधितास परस्पर कळविणे अपेक्षित आहे. परंतू असे न करता संबंधित प्रकरणे / संदर्भ थेट संचालनालयास सादर केले जातात. अशा काही संदर्भांवर कार्यवाही होणेस विलंब होऊन मा.न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवतात, विधानमंडळाशी संबंधित प्रश्न उपस्थितीत होतात तसेच लोकायुक्त / विविध आयोगाकडे प्रकरणे उद्‌भवतात. त्यामुळे संचालनालयाचा धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणेच्या कामाऐवजी केवळ किरकोळ व वैयक्तिक संदर्भाबाबत बहुमुल्य वेळ व श्रम याचा अपव्यय होत असल्याचे दिसून येते. यामुळे दप्तर दिरंगाई होवून कर्मचाऱ्यांमध्ये / विविध कर्मचारी संघटनामध्ये असंतोष निर्माण होत आहे, असे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

**३. सबब, याद्वारे पुनश्चः आपणास कळविणेत येते की, नगरपरिषदा /नगरपंचायतींच्या आस्थापनाविषयक बाबींसंदर्भात वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाचे पालन न होणे, ही बाब अनूचित व अशोभनीय आहे. याकरिता, जिल्हा सह आयुक्त व मुख्याधिकारी यांनी दिनांक २३.०५.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीचे तंतोतंत काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.**

**यापूढे सदर आदेशाचे व कार्यपध्दतीचा अवलंब / पालन न केल्यास किंवा थेट संचालनालयास संदर्भ / पत्रव्यवहार केल्यास संबंधित संदर्भाची दखल घेतली जाणार नाही व होणाऱ्या परिणामास संबंधित जिल्हा सह आयुक्त व मुख्याधिकारी जबाबदार राहतील. तसेच सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या बेजबाबदार संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर नियमोचित कार्यवाही करणेत येईल,याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(मनोज रानडे,भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,

प्रति,

१. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कोकण, नाशिक,पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
२. सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय(सर्व )
३. मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत (सर्व )
४. निवड नस्ती.